# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/०३/२०२६ (बुधवार )**

---

## मा.श्री संदीप पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक,नागपुर परिक्षेत्र यांनी पोलीस स्टेशन काटोल येथे नागरिक आणि पोलीस पाटील यांची सभा घेवुन संवाद साधला तसेच मार्गदर्शन केले.

दिनांक १०/०३/२०२६ रोजी मा. श्री. संदीप पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र यांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, कार्यालय काटोल येथे वार्षीक निरीक्षकासाठी भेट दिली. सदर भेटीदरम्यान त्यांनी पोलीस स्टेशन काटोल हद्दीतील नागरिक आणि पोलीस पाटील यांची यांची सभा घेवुन त्यांच्या अडीअडचणी जाणुन घेतल्या तसेच त्यांच्या सोबत संवाद साधुन त्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

मा. श्री संदीप पाटील यांनी नागरिकांना तसेच उपस्थित पोलीस पाटील यांना कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीसांना सहकार्य करण्याबाबत अवाहन केले. सदर सभेत गावात शांतता प्रस्थापीत करावी, तसेच गावतील इतर महत्त्वाच्या हालचालींबाबत , अवैध धदयांबाबत पोलीसांना माहीती दयावी. अशा अनेक महत्त्वाच्या मुद्दयांवर संवाद साधुन मार्गदर्शन केले. पोलीस आणि नागरिक यांच्यामध्ये जलद आणि सुलभ संवादाकरीता तयार केलेला व्हॉटस्ॲप ग्रुप वर सुध्दा नागरिकांनी तसेच पोलीस पाटलांनी माहीती दयावी अशा सुचना दिल्या. या कार्यक्रमाच्या माध्यमातून पोलीस प्रशासन व नागरिक यांच्यातील संवाद अधिक दृढ होऊन परस्पर सहकार्याने परिसरात शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

सदर सभेला मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री पराग पोटे, उपविभागिय

पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री रंजित शिरसाठ, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन काटोल आणि इतर पोलीस अधिकारी, अंमलदार हजर होते.





# मा.पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी टोळीने अवैध दारूचा व्यावसाय करणाऱ्या २ आरोपीतांना १ वर्षाकरीता केले हद्दपार

**पोलीस स्टेशन मौदा हददीतील टोळीने अवैध दारू काढणारे, विक्री करणारे तसेच अवैध दारू व्यवसायात सक्रिय २ आरोपीतांच्या टोळीला मा. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांनी हद्दपारीचे आदेश काढले आहे.**

पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत अवैध दारू व्यवसायात सक्रिय खालील टोळीतील सदस्यांना नागपुर ग्रामीण हद्दीतून १ वर्षाकरीता हद्दपार करण्यात आले आहे. **पोलीस स्टेशन मौदा हद्दीतील महादुला शिवारातील मौदा—भंडारा हायवे रोडलगत बोरगाव येथे गब्बा ढाबा चा मालक महेश उर्फ विक्की नागेश्वर डोईफोडे, वय २८ वर्षे, व त्याच्या कडे कामाला असणारा संजय राजाराम हरडे, वय ४३ वर्षे दोन्ही रा. जवाहरनगर, ता.जि. भंडारा यांचेवर** अवैध विक्रीचे अनेक गुन्हे दाखल आहेत ते टोळीने एकत्रीत गुन्हे करण्याचे सवयीचे आहेत. त्यांचेवर **वेळोवेळी प्रभावीपणे महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये कार्यवाही करून गुन्हे नोंद करण्यात आले.** नमुद आरोपीतांचे गुन्हेगार कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी पोलीसांनी त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीतांच्या गुन्हेगारी कृत्यामुळे अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे वर नमुद २ आरोपीतांचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ अन्वये हद्पार करण्याचा प्रस्ताव मौदा पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान यांच्या मार्फतीने मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे कार्यालयात पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद २ आरोपीतांना १ वर्षाकरीता नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.



महेश उर्फ विक्की नागेश्वर डोईफोडे



संजय राजाराम हरडे

# जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद ११ गोवंश जनावरांची सुटका, कोंढाळी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— दिनांक ११/०३/२०२६ रोजी रात्री कोंढाळी पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मरकसुर कलमुंडा रोडने अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मरकसुर कलमुंडा रोडने नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान टाटा योद्धा गाडी क्र. एम एच २८ बी बी ४६१४ हे मिळुन आले. सदर वाहन चालकास थांबवण्याचा इशारा केला असता वाहन चालकाने पोलीसांचे वाहन पाहुन गाडी थांबवुन वाहनामधुन उडी मारून अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेला. पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ११ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन, चारा पाण्याची व्यवस्था न करता वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक वाहन टाटा योद्धा वाहन क्र. एम एच २८ बी बी ४६१४ किंमती ५,००,०००/—रूपये आणि ११ गोवंश जनावरे किंमती १,१२,०००/—रूपये असा एकुण ६,१२,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

**नमुद प्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरूद्ध कलम ११(१) (ड) (घ)(च) प्राण्यांना निर्दयतेने वाहतुक प्रतीबंधक अधिनियम, सहकलम ५ (अ) (ए) (१) महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम भान्यासं, सहकलम ११९ म. पो.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
# वाहनासह ५ लाख ४ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
# स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवलापार** :— दिनांक १०/०३/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे रामटेक उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा चोरबाहुली जवळील नाला येथे नाकाबंदी केली असता ट्रॅक्टर क्रमांक एम. एच. ४० बी जे ३९४३ त्याला जोडुन विना क्रमांकाची ट्रॉली मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रॅक्टरचा चालक नामे **नितेश वासुदेव उईके, वय ३२ वर्ष, रा. सोनेघाट ता. रामटेक** हा मिळुन आला. ट्रॅक्टर मालकाचे नाव विचारले असता **२) देवचंद देवाधारी, रा. मरारवाडी ता. रामटेक** अशी माहीती प्राप्त झाली. तसेच पोलीसांनी आरोपी चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस

केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन १) ट्रॅक्टर क्रमांक एम. एच.—४०/बी जे— ३९४३ व विना क्रमांकाची ट्रॉली किंमती ५,००,०००/—रूपये २) ०१ ब्रास रेती किंमती ४,०००/— रूपये असा एकुण ५०४०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद आरोपी १) नितेश वासुदेव उईके, वय ३२ वर्ष, रा. सोनेघाट ता. रामटेक २) देवचंद देवाधारी, रा. मरारवाडी ता. रामटेक यांच्या विरूध्द पोस्टे देवलापार येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या १३ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक १०/०३/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा पावडदौना येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचुन धाड टाकली

असता **आरोपी नामे १) मंगेश सहादेवजी मोहनकर, वय ३४ वर्ष, रा. जुनी मच्छीसाद न्यु दुर्गा चौक मौदा २) गुड्डु ताराचंद बारापत्रे, वय २२ वर्ष, रा. जुनी मच्छीसाद गरदेव चौक, मौदा त. मौदा, जि. नागपूर ३) राजु विठ्ठल कुहीकर, वय ५२ वर्ष,रा. जुनी मच्छीसाद, न्यु दुर्गा चौक मौदा ४) दुर्गेश धनराज लांजेवार, वय ३५ वर्ष, रा. वार्ड नं. ५, रामनगर मौदा, ता. मौदा जि. नागपूर ५) शंकर भोजराज बावने, वय ३५ वर्ष, रा. रामनगर मौदा ६) रुपेश नविनराज वानखेडे, वय २८ वर्ष, रा. पावडदौना रोड, वार्ड नं. १४, मौदा ७) महेन्द्र हरीदास उके, वय ४१ वर्ष, रा. ढिवर मोहल्ला, वार्ड नं. १६ मौदा ८) धिरज ईश्वर बावने, वय २४ वर्ष, रा. ढिवर मोहल्ला, वार्ड नं. ८, मौदा ९) रामचंन्द्र रामकृष्ण निखारे, वय ४६ वर्ष, रा. राम नगर, वार्ड नं. ५, मौदा १०) दुर्योधन भोजराज उमक, वय ३८ वर्ष, रा. जुनी मच्छीसाद, न्यु दुर्गा चौक मौदा ११) योगेश बाजीराव केळवदे, वय ३० वर्ष, रा. जुनी मच्छीसाद, न्यु दुर्गा चौक मौदा १२) गुलाम सकुर शेख, वय ४५ वर्ष, रा. पावडदौना रोड, वार्ड नं. १४, मौदा १३) प्रमोद गुलाब निखारे, वय ३७ वर्ष, रा. गरदेव चौक मौदा** हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना जागीच मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तासपत्ते व नगदी ३,७१०/— रूपये असा एकुण ३,७६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन मौदा येथे १२ महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ४५ हजार ३६० रूपयाचा मुद्देमाल जप्त, पोलीस स्टेशन सावनेर यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक १०/०३/२०२६ रोजी सावनेर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, दुचाकी वाहनाने **अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ मौजा पाटणसावंगी ते ईटनगोटी रोड येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान विनाक्रमांकाची काळया रंगाची ॲक्टीव्हा मोपेड मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी दारू मिळुन आली. **आरोपी नामे जगदीश रामप्रसाद सुमन, वय ३३ वर्ष,**

रा. फेटरी हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या १९२ निपा  किंमती १५,३६०/— रूपये, विना क्रमांकाची ॲक्टीव्हा मोपेड किंमती ३०,०००/—रू असा एकुण किंमती ४५,३६०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन सावनेर येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने